## आर्किटेक्चरच्या विद्यार्थिनीला नॅशनल डिझाईन अॅवॉर्ड

# राजश्री बिर्ला यांच्या हस्ते विजेतीचा सन्मान

**मुंबई :** जागृती जैन या ग्वाल्हेर येथील एमआयटीएस (माधव इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजी अॅण्ड सायन्स)च्या आर्किटेक्चर विभागाच्या चौथ्या वर्षाच्या विद्यार्थिनीने नॅशनल डिझाईन अॅवॉर्ड जिंकले. 'बिर्ला व्हाईट युवारत्न' स्पर्धेत अमरावती कन्व्हेन्शन सेंटरच्या तिच्या मागील वर्षातील संकल्पनेसाठी हा पुरस्कार तिला देण्यात आला. भारतीय आर्किटेक्चरच्या क्षेत्रात हा बिर्ला व्हाईट पुरस्कृत पुरस्कार सर्वोच्च मानाचा मानला जातो.



पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांच्या 'डिझाईन इन इंडिया' या सुंदर भारताच्या उभारणीच्या ध्येयवाक्याशी सुसंगत अशी ही स्पर्धा तरुण आर्किटेक्टना त्यांचे सर्वोत्तम काम करण्यासाठी प्रेरित करते. भारत आणि नेपाळच्या आर्किटेक्चर क्षेत्रातून या वर्षीच्या स्पर्धेला उदंड प्रतिसाद लाभला.